# महावितरण
## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

महाराष्ट्र शासनाचा (उपक्रम)
CIN : U40109MH200SSGC153645

दुरध्वनी क्र. : २६४७४२११/२६४७२१३१
वि.क्र. ३६२४
Website : www.mahadiscom.in
E-mail : dccell@mahadiscom.in

शिस्तभंग कारवाई कक्ष
"प्रकाशगड", ४ था मजला,
अनंत काणेकर मार्ग,
स्टेशन रोड, बांद्रा (पूर्व),
मुंबई - ४०० ०५१.


क्र.मासं/शिनि/परिपत्रक/२०१८/२५०००  दि.२२/१०/२०१८

## परिपत्रक

**विषय: निलंबन व निलंबन पुर्नविलोकनाबाबतच्या तरतुदींबाबत.**

प्रशासकीय परिपत्रक क्र.१ दि. २९/०९/२००५ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांनी संचालक (प्रकल्प), संचालक (वाणिज्य), संचालक (संचलन), व संचालक (वित्त) यांचेशी विचार विनियम करुन कर्मचारी सेवाविनियम २००५ क्र. ८८ मध्ये विहीत केलेल्या निलंबन पुर्नविलोकन विषयक तरतुदीस खालील प्रमाणे सुधारित करण्याकरीता मंजुरी प्रदान केलेली आहे.

म.रा.वि.वि.कं.मर्या., कर्मचारी सेवाविनियम क्र. ८८ मध्ये निलंबनाबाबतचे नियम विस्तृतपणे नमूद केले आहेत. परंतु वेळोवेळी क्षेत्रीय कार्यालयातील सक्षम अधिकाऱ्यांकडून निलंबनाबाबतच्या नियमांचे उल्लंघन करुन ठोस व सबळ कारणांशिवाय कर्मचाऱ्यांना निलंबित केले जाते. तसेच विहीत मुदतीत शिस्तभंग कार्यवाही पूर्ण न झाल्यामुळे कर्मचारी जास्त काळ निलंबित रहातात. त्यामुळे व्यवस्थापनाला निलंबित कर्मचाऱ्यांस निर्वाह भत्ता अदा करणे भाग पडते व उपलब्ध मनुष्यबळ वापराविना रहाते. सबब, निलंबनाबाबतच्या सेवाविनियमातील तरतूदीमध्ये पुढे नमूद बदल करण्यात येत आहेत. जेणेकरुन व्यवस्थापनास उपलब्ध मनुष्यबळाचा पुरेपूर वापर (Optimum use of resources) करुन घेणे शक्य होईल.

**अ) निलंबनासारखी गंभीर कार्यवाही करण्यापूर्वी तपासून पहावयाच्या प्रमुख बाबी.**

सेवाविनियम क्र. ८८ (क) मध्ये खालीलप्रमाणे तरतूद विहीत केलेली आहे.

"ज्या कर्मचाऱ्यांवर गैरवर्तणुकीचा आरोप आहे. किंवा फौजदारी अपराधाबद्दलच्या प्रकरणी अन्वेषण चौकशी किंवा न्यायचौकशी चालू आहे अशा कर्मचाऱ्यास त्याने धारण केलेल्या पदावर किंवा ज्या पदावर तो काम करीत असेल तेथे त्यास राहू दिल्याने चौकशीस बाध येण्याची किंवा अन्यथा असे करणे कामकाजास किंवा उपक्रमाच्या/संस्थेच्या हितसंबंधांस बाधक ठरण्याची शक्यता असेल तर , सक्षम अधिकारी त्यास निलंबित करु शकेल."

कर्मचारी/अधिकारी निलंबन करतेवेळी त्यानुसार, उपरोक्त तरतूदींची पूर्तता होणे आवश्यक आहे. निलंबन करण्यापूर्वी सक्षम अधिकाऱ्यांनी यांचे निलंबनाची खरोखर गरज आहे का हे तपासून पहावे व या तरतुदींची पूर्तता होत असेल तरच निलंबन करण्याची कारणे स्पष्टपणे नोंदवून निलंबनासारखी गंभीर कार्यवाही करावी.

**ब) निलंबन कालावधीतील मुख्यालय निश्चित करणेबाबत.**

i) ज्या सक्षम अधिकाऱ्याने कर्मचाऱ्याचे निलंबन केले आहे त्याने निलंबनानंतर मुख्यालय ठरवताना ते स्वत:च्या कार्यक्षेत्रातीलच विहीत करावे/नेमून दयावे.

ii) निलंबनानंतरचे मुख्यालय हे कर्मचारी कार्यरत असणाऱ्या ठिकाणापेक्षा भौगोलिक दृष्टया वेगळे असावे.

**क) <u>निलंबन पुनर्विलोकन करताना विचारात घ्यायच्या अटी.</u>**

i) निलंबन केल्यानंतर आरोपपत्र देणे व आरोपपत्रास उत्तर सादर झाल्यानंतर चौकशी अधिकाऱ्यांची नेमणूक ३ महिन्यांच्या मुदतीत झाली असेल तर निलंबन करणारा अधिकारी निलंबित अधिकारी कर्मचाऱ्यांचे निलंबन पुनर्विलोकन करेल.

ii) प्राथमिक चौकशी पूर्ण करुन एकदा आरोपपत्र देण्याची कारवाई पूर्ण झाल्यानंतर व आरोपित कर्मचाऱ्याने आरोपपत्रास उत्तर सादर केल्यानंतर अथवा उत्तर सादर केले नसल्याने एकतर्फी चौकशी आधिकारी नेमला गेला असल्यास व या प्रक्रियेस ३ महिन्यापेक्षा जास्त कालावधी लागला असल्यास निलंबन पुनर्विलोकनाकरीता सक्षम अधिकाऱ्यांने तसा प्रस्ताव लगतवरच्या अधिकाऱ्यांकडे सादर करणे बंधनकारक राहील. निलंबित कर्मचाऱ्याने अर्ज केला असेल अगर त्याचा अर्ज प्राप्त झाला नसला तरीही सक्षम अधिकाऱ्याच्या लगतवरचा अधिकारी निलंबित कर्मचाऱ्याचे निलंबन पुनर्विलोकन करेल.

उपरोक्त प्रकरणात निलंबन पुनर्विलोकन करणारा अधिकारी आवश्यकतेनुसार पदस्थापनेचा प्रस्ताव प्रकरणपरत्वे बदली करण्यास सक्षम असणाऱ्या अधिकाऱ्याकडे वर्ग करेल.

iii) परंतु क (i) व (ii) नुसार सदर निलंबन मागे घेताना पुढील प्रकरणे अपवाद राहतील.

१) एसीबी/क्रिमीनल/वीज चोरी इत्यादी प्रकरणे ज्यांचे निलंबन पुनर्विलोकन करणे निलंबन पुनर्विलोकन समितीच्या अधिकारात मोडते.

२) आरोपपत्रात ज्या कर्मचाऱ्यांवर अफरातफर (फ्रॉड), कंपनीच्या मोठया नुकसानीस जबाबदार ठरणे असे गंभीर आरोप लावण्यात आले आहेत व ज्या प्रकरणांमध्ये बडतर्फी/सेवा समाप्ती सारखी शिक्षा देण्यात येऊ शकते अशा प्रकरणात आरोपपत्रास उत्तर सादर केल्यानंतर व चौकशी अधिकारी नियुक्त झाल्यानंतर उपरोक्त नमूद (i) व (ii) प्रमाणे निलंबन पुनर्विलोकन करणे बंधनकारक ठरणार नाही. मात्र तसे सविस्तर कारणमिमांसेसह सक्षम अधिकाऱ्यांनी त्यांच्या लगतवरच्या अधिकाऱ्यांना कळविणे अनिवार्य असेल.

या व्यतिरिक्त सेवाविनियम क्र.८८ मधील इतर तरतूदी अबाधित राहतील.

**ड) <u>निलंबन पुनर्विलोकन समितीच्या मार्गदर्शक तत्वांमध्ये बदल करणेबाबत.</u>**

परिपत्रक क्र. २७२४ दि.११/११/२००५ अन्वये निलंबन पुनर्विलोकन करताना अवलंब करावयाची मार्गदर्शक तत्वे सूचित करण्यात आले होती. तसेच प्रशासकीय परिपत्रक ५५२ दि. २०/०८/२००६ अन्वये परिपत्रक २७२४ मधील अटींमध्ये सुधारीत तत्वे अंतर्भूत करण्यात आली आहेत. तदनंतर परिपत्रक क्र. २८३९८ दि. १३/०७/२०१५ अन्वये सुधारीत शासन निर्णयाप्रमाणे परिपत्रक क्र.२७२४ दि.११/११/२००५ मध्ये अंशत: बदल करण्यात येऊन निलंबन पुनर्विलोकन समितीमार्फत निलंबन पुनर्विलोकनाकरता सुधारीत अटी निर्धारित करण्यात आल्या होत्या.

आता निलंबन पुनर्विलोकनाबाबतच्या यापूर्वी सर्व महत्त्वाच्या सूचना पुढीलप्रमाणे नमूद करण्यात येत आहेत.

१) शासन निर्णयाप्रमाणे लाचलुचपत प्रतिबंधक खात्याच्या कारवाई अंतर्गतच्या प्रकरणांमध्ये निलंबन कालावधी हा १ वर्ष पूर्ण झालेला असावा., त्यांचेबाबत अभियोग दाखल करण्यास मंजुरी दिलेली असावी व त्यांचे विरोधात विभागीय कारवाई अंतर्गत आरोपपत्र देण्यात आलेले असावे.

२) (i) गुन्हेगारी स्वरुपाच्या कंपनीच्या कामकाजाशी संबंधित प्रकरणामध्ये निलंबन कालावधी हा १ वर्ष पूर्ण झालेला असावा.

(ii) गुन्हेगारी स्वरुपाच्या कंपनीच्या कामकाजाशी सबंधित नसलेल्या प्रकरणामध्ये निलंबन कालावधी हा ६ महिने पूर्ण झालेला असावा.

३) ज्या प्रकरणात विभागीय कार्यवाही पूर्ण झालेली आहे अशा प्रकरणात, प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन निलंबनाची उपरोक्त नमूद विहीत मुदत पूर्ण झाली नसेल तरीही निलंबन कालावधी पुनर्विलोकन करण्याचा निर्णय प्रकरणपरत्वे समितीमार्फत घेण्यात येईल.

४) परिपत्रक्र क्र. २७२४ दि. ११/११/२००५ मधील परिच्छेद क्र. ६ (iv) अन्वये विहीत केलेले निलंबन पुनर्विलोकन केल्यानंतर करावयाच्या पदस्थापने बाबत तसेच पदस्थापनेनंतर त्या अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या पदस्थापनेत करावयाच्या बदला बाबतच्या विहीत केलेल्या तरतूदी अबाधित राहतील.

सदर प्रशासकीय परिपत्रक जारी केल्याच्या तारखेपासून लागू राहील. सदर प्रशासकीय परिपत्रक कंपनीच्या R-APDRP Portal वर उपलब्ध करण्यात आले आहे.

22/10

**(संदेश हाके)**
**मुख्य महाव्यवस्थापक (मासं)**